Immediate

Disposal of Official Business
<u>during President Rule.</u>

Government of Maharashtra
General Administration Department,
Order No. ROB 2019/CR-93/18 (O&M),
Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai-400 032,
Dated the 20th November, 2019.

ORDER

In Exercise of the powers conferred upon him under Article 166 of the Constitution of India read with President of India's Order No.G.S.R. 837 (E) dated the 12th November 2019, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following order pertaining to the disposal of official business. :-

(1) All matters which were required to be put up to the Council of Ministers under Schedule II of the Rules of Business and all such cases where Ministers had to obtain orders of the Chief Minister, would now be routed through the Chief Secretary of Maharashtra to the Governor.

(2) Proposals regarding transfers and postings of Officers of the rank of Joint Secretaries and above and in respect of IAS/IPS and IFS cadre, of and above the ranks of Collectors/Superintendents of Police will be routed through the Chief Secretary of Maharashtra to the Governor. All transfers which were earlier being done by the Chief Minister will be done by the Governor.

(3) Matters pertaining to law and order will be routed through the Chief Secretary of Maharashtra to the Governor.

(4) Routine cases which were being settled at the level of Minister may be finally decided by the Governor through the Chief Secretary.

(5) The cases where more than one department is concerned the matter may be decided in consultation with the Chief Secretary by the Governor.

(6) Regarding legislative matters factual information and present status may be communicated with the approval of the Secretary of the Department to the Legislature Secretariat.

(7) All administrative and financial matters of urgent and time bound nature, which are beyond the power of the Chief Secretary should be submitted to the Governor through the Chief Secretary.

(8) Affidavits giving only factual information and existing status should be approved by the Secretary of the Department. Any affidavit which has policy implications should be submitted to the Governor through the Chief Secretary.

2. This order of Government of Maharashtra is available at the website www.maharashtra.gov.in. Reference No. for this is 201911211008470807. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJOY MEHTA

Digitally signed by AJOY MEHTA
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6cd985f04d38fef505754856131307df708dca9bbcea90df80882d2257d79126, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=85c1fa2cdc7cf754bc479fb6ae97bc65889de163fa7e4c775fec1ed9e37334f3, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=AJOY MEHTA
Date: 2019.11.21 10:31:40 +05'30'

(Ajoy Mehta)

Chief Secretary to Government of Maharashtra.

To

1. All Additional Chief Secretaries, Mantralaya,
2. All Principal Secretaries, Mantralaya,
3. All Secretaries, Mantralaya,
4. Secretary to Hon'ble Governor.

तात्काळ

राष्ट्रपती राजवटीच्या कालावधीत शासकीय
कामकाज निकाली काढण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
आदेश क्र. शाकानि २०१९/प्र.क्र. ९३/१८ (र. व का.),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २० नोव्हेंबर, २०१९.

आदेश

भारतीय राज्य घटनेच्या कलम १६६ अनुसार प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन तसेच भारताचे राष्ट्रपती यांचे आदेश क्र. जी. एस. आर. ८३७ (अ), दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ अनुसार, महाराष्ट्राचे राज्यपाल याव्दारे शासकीय कामकाजाचे खालीलप्रमाणे वाटप करीत आहेत:-

१. शासन कार्य नियमावलीच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या ज्या बाबींसाठी मंत्रीपरिषदेची मान्यता आवश्यक होती, तसेच ज्या प्रकरणी मंत्र्यांनी, मुख्यमंत्र्यांचे आदेश प्राप्त करणे आवश्यक होते, अशी सर्व प्रकरणे आता मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत राज्यपाल यांना सादर करण्यात येतील.

२. सह सचिव आणि त्या वरील दर्जाचे अधिकारी तसेच भारतीय प्रशासन सेवा / भारतीय पोलीस सेवा /भारतीय वन सेवेतील अधिकारी त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी / पोलीस अधिक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी यांच्या बदली आणि पदस्थापनेची प्रकरणे मुख्य सचिव यांच्या मार्फत राज्यपाल यांना सादर करण्यात येतील. ज्या बदल्या यापूर्वी मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने करण्यात येत होत्या, अशा सर्व बदल्या आता राज्यपाल यांच्या मान्यतेने करण्यात येतील.

३. कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित बाबी मुख्य सचिव यांचे मार्फत राज्यपाल यांना सादर करण्यात येतील.

४. सर्व साधारण प्रकारची प्रकरणे जी मंत्र्यांच्या स्तरावर निकाली काढण्यात येत होती, ती मुख्य सचिव यांचेमार्फत राज्यपाल निकाली काढतील.

५. ज्या प्रकरणात एकापेक्षा जास्त विभागांचा संबंध येतो, अशी प्रकरणे राज्यपाल, मुख्य सचिवांशी विचारविनिमय करुन निकाली काढतील.

६. विधानमंडळाशी संबंधित बाबीसंदर्भात वस्तुनिष्ठ माहिती आणि सद्यस्थिती विभागांच्या सचिवांच्या मान्यतेने विधानमंडळ सचिवालयास कळविण्यात येईल.

७. मुख्य सचिवांच्या शक्तीच्या मर्यादेपलिकडील तातडीच्या आणि कालमर्यादा असलेल्या सर्व प्रशासकीय आणि वित्तीय बाबी मुख्य सचिवांमार्फत राज्यपाल यांना सादर करण्यात याव्यात.

८. वस्तुनिष्ठ माहिती आणि सद्यस्थितीची माहिती देणारी शपथपत्रे विभागांच्या सचिवांच्या मान्यतेने दाखल करण्यात यावीत. धोरणात्मक बाबींसंबंधित (policy implication) कोणतेही शपथपत्र मुख्य सचिवांमार्फत राज्यपाल यांना सादर करण्यात यावे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१९११२११००८४७०८०७ असा आहे. तसेच डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJOY MEHTA

Digitally signed by AJOY MEHTA
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6cd985f04d38fef505754856131307df708dca9bbcea90df80882d2257d79126, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=85c1fa2cdc7cf754bc479fb6ae97bc65889de163fa7e4c775fec1ed9e37334f3, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=AJOY MEHTA
Date: 2019.11.21 10:30:56 +05'30'

(अजोय मेहता)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व अपर मुख्य सचिव, मंत्रालय,
२. सर्व प्रधान सचिव, मंत्रालय,
३. सर्व सचिव, मंत्रालय,
४. मा. राज्यपाल यांचे सचिव